भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील "उप-अभियंता (यांत्रिकी)" संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमित बदल्या- २०१९

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन आदेश क्रमांकः आपना-०२१९/प्र.क्र.१६/पापु-१५

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल, नवीन मंत्रालय इमारत,
क्रॉफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुबई ४०० ००१
तारीख: ३१ मे, २०१९

शासन आदेश -

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील "उप अभियंता (यांत्रिकी)" संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात येत असून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	उप अभियंत्याचे नाव	सध्याचे कार्यालय	बदलीनंतरचे कार्यालय
१	२	३	४
१	श्री.मिलींद ए. चव्हाण	संचालनालय, पुणे.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, रायगड.
२	श्री.संजय एस. पुरंदरे	प्रादेशिक उपसंचालक, भूसवियं, कोकण.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.
३	श्री. सुधीर नारायण सुर्यवंशी	देखभाल दुरूस्ती कक्ष, जिल्हा परिषद, सोलापूर.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, नांदेड.
४	श्री. नंदकुमार एम. लोणकर	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, पुणे.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, अकोला.
५	श्री. अधिराज के. पाटील	देखभाल दुरूस्ती कक्ष, जिल्हा परिषद, ठाणे.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, वाशिम.
६	श्री. एम.व्ही. व्हटकर	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, वर्धा.

अ.क्र.	उप अभियंत्याचे नाव	सध्याचे कार्यालय	बदलीनंतरचे कार्यालय
१	२	३	४
७	श्री. नितीन एम. दंडगव्हाळ	प्रादेशिक उपसंचालक, भूसवियं, नाशिक.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, गोंदिया.
८	श्री. हेमंत व्ही. अत्रे	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली.
९	श्री. ए.पी. डोमाडे	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, नाशिक.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, धुळे.
१०	श्री. एम.एम. भट	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा.	प्रादेशिक उपसंचालक, भूसवियं, नाशिक.
११	श्री. जे. बी. लाडे	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सांगली.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, हिंगोली.
१२	श्री. एम.आर. लाड	देखभाल दुरूस्ती कक्ष, जिल्हा परिषद, जालना.	यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, बीड.

बदली आदेशाची तात्काळ व कार्यक्षमरित्या अंमलबजावणी होण्याकरीता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांना सूचित करण्यात येते की, बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व कार्यालय प्रमुखांनी पर्यायी अधिकारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या अधिकाऱ्यांना दिनांक ३१ मे, २०१९ (म.न.) पर्यंत कार्यमुक्त करावे.

२. बदली झालेले अधिकारी त्यांच्या संबंधित कार्यालयातून कार्यमुक्त होऊन रूजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रूजू करून घ्यावे. एखाद्या अधिकाऱ्याला रूजू करून न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षाधीन काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित कार्यालय प्रमुखास व आस्थापना अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल.

३. सदरहू आदेशान्वये पदस्थापना करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू होणे आवश्यक आहे. पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास अथवा बदली आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात त्याची नोंद घेण्यात यावी. तसेच सदर कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक)

नियम, १९७९ मधील नियम क्रमांक ३ (तीन) व नियम क्रमांक २३ चा भंग करणारी असल्यामुळे असे अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

४. सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे दिनांक ३१ मे, २०१९ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाने काढावे. दिनांक ०१ जून, २०१९ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपुर्वीच्या कार्यालयाकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित अधिकारी बदलीच्या कार्यालयात हजर झाल्यानंतर बदली नंतरच्या कार्यालयाने काढावे व तसा अहवाल शासनास सादर करावा. दिनांक ०१ जून, २०१९ पासूनचे वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल, अशा सूचना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुखांना तसेच सर्व जिल्हा जिल्हा परिषदांना देण्यात येत आहेत.

बदली झालेल्या अधिकाऱ्यांना दिनांक ३१/०५/२०१९ (म.न.) पर्यंत कार्यमुक्त न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून एकतर्फी कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील. बदली झालेल्या संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून ते बदली झालेल्या कार्यालयात रूजू झाले आहेत किंवा कसे, याची माहिती तात्काळ शासनास सादर करण्याबाबत संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना सूचित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५३११७५१२०८४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2019.05.31 19:46:19 +05'30'

(चेतन निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित उपअभियंता (यांत्रिकी), भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व जिल्हा परिषद (संबंधित)

प्रत-

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, पुणे.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबधित)
६. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर, अमरावती, औरंगाबाद,नाशिक, पुणे, कोकण.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, संबंधित सर्व जिल्हे.
८. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व संबंधित).
९. निवडनस्ती कार्यासन, पापु-१५